Nashik Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
In Association with riso

प्रोमो-रन

नाशिकमधील सर्वात मोठी हाफ मॅरेथॉन

७५ वर्षांचे तरुण

प्रोमो-रन स्पर्धेत गेणू गायधनी या ७५ वर्षीय आजोबांनी दहा किलोमीटरची स्पर्धा पूर्ण केली. पळसे येथील या आजोबांनी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पहाटेच नाशिक गाठले. अंगात सदरा, पायाजमा आणि चप्पल अशा पेहरावात आलेल्या रंगीत टी-शर्ट अंगात चढविला आणि स्पर्धा पूर्ण केली. त्यांचा हा उत्साह तरुणांना लाजविणारा होता.विशेष म्हणजे ८ ऑक्टोबरच्या १० किलोमीटरमध्येही सहभागी होण्याची त्यांची इच्छा त्यांनी बोलून दाखविली.

◆

'प्रोमो-रन' जिंकली आता लक्ष्य 'महामॅरेथॉन'

मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घ्यायचा हेच ध्येय होते. प्रथम येण्याचे ध्येय ठेवले नव्हते. मोठ्या स्पर्धेचा हा पहिलाच अनुभव होता. परंतु दर्जेदार स्पर्धा आणि स्पर्धेचा उत्साह काय असतो हे प्रोमो-रनवरुन लक्षात आले. ८ ऑक्टोबरच्या महामॅरेथॉन स्पर्धेविषयी उत्सुकता आता वाढली आहे.

- सपना पगारे, प्रोमो रन विजेती

◆

नाशिकमध्ये मॅरेथॉन संस्कृती रुजेल

लोकमत समूहातर्फे आयोजित मॅरेथॉनच्या उपक्रमामुळे नाशिकमध्ये मॅरेथॉन स्पर्धेची संस्कृती रुजेल. आत्तापर्यंत मुंबईसह अनेक मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेतला आहे. स्पर्धा आयोजनामुळे या स्पर्धेचा दर्जा खेळाडूंना उत्साह वाढविणारा होता. यामुळे नाशिकला मॅरेथॉन संस्कृती रुजेल. - सुमन हटकर , प्रोमो रन विजेती

◆

पहिल्याच स्पर्धेने दिला अद्‌भुत आनंद

नाशिकच्या महामॅरेथॉनसाठी घेण्यात आलेली प्रोमो-रन ही पहिलीच स्पर्धा आहे की ज्यात भाग घेतला. एक उत्कृष्ट अनुभव आला. या स्पर्धेने मनोधैर्य वाढले असून, आपणही पळू शकतो असा आत्मविश्वास मिळाला. धावणे आणि मॅरेथॉनबद्दलचा आपला अनुभवच अद्‌भुत होता. आयुष्याला कलाटणी देणारी स्पर्धा होती. पुढील स्पर्धेतही सहभाग नोंदविणार आहे.

- शिवलीकर, प्रोमो रन विजेती

◆

'प्रोमो-रन'मुळे आमच्यातील उत्साह वाढला

नाशिमध्ये महामॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविलेला आहे. 'प्रोमो-रन'मध्ये धावल्याने आता ८ ऑक्टोबरच्या स्पर्धेचा उत्साह वाढला असून, या स्पर्धेची आता प्रतीक्षा आहे. अतिशय चांगले नियोजन झाल्याने स्पर्धेचा दर्जा वाढला आहे. महिलांसाठी प्रोत्साहन देणारी ही स्पर्धा आहे.

- झरना हळदर, प्रोमो रन विजेती

◆

स्पर्धेचा उत्तम दर्जा उत्साह वाढविणारा

या स्पर्धेमुळे प्रेरणा मिळाली. राष्ट्रीय दर्जेदार स्पर्धेत सहभाग घेतल्याची अनुभूती आली. नियोजन चांगले होते. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यात येत होते. त्यामुळे उत्साह वाढला. त्यामुळे येत्या ८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या स्पर्धेकडे लक्ष आहे.

-प्राची भोर, प्रोमो रन विजेती

◆

उत्कृष्ट आयोजनामुळे उत्साहन दुणावला

नाशिक महामॅरेथॉन स्पर्धेच्या पूर्वी झालेल्या प्रोमो-रनचे आयोजन पाहता आता ८ ऑक्टोबर रोजीच्या स्पर्धेची उत्सुकता लागली आहे. दर्जेदार आयोजनामुळे नाशिककरांनी राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेचा अनुभव नक्कीच घेतला असेल. आयोजनाच्या पातळीवर सर्वच नियोजन उत्कृष्ट होते. स्पर्धात्मक वातावरण निर्मितीमुळे नाशिककरांमध्ये उत्साह दुणावला आहे. स्पर्धकांच्या प्रतिक्रियाही उत्स्फूर्त असल्याने ऑक्टोबरमध्ये होणारी महामॅरेथॉन स्पर्धा अतिशय भव्य होणार यात शंका नाही. आम्हाला आता महामॅरेथॉनमध्ये काय धमाल असेल याचीच उत्सुकता आहे.

-अतुल जंत्रे, धावपटू

भागो रे!
FINISH
RUN FOR MYSELF

प्रोमो-रन : नाशिक महामॅरेथॉनच्या पुर्वतयारीनिमित्त घेण्यात आलेल्या प्रोमोरनमध्ये सहभागी झालेल्या धावपटूंनी एकच धाव घेत उदंड प्रतिसाद दिला.

प्रोमो रनमध्ये अपूर्व उत्साह

८ ऑक्टोबरच्या महामॅरेथॉनची रंगीत तालीम

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : वाद्यांचा दणदणाट, झुंबाची ऊर्जा आणि ढोल-ताशांसह तुतारीचा गजर अशा अपूर्व उत्साहात प्रोमो रनमध्ये हजारो नाशिककर धावले. नाशिक महामॅरेथॉन स्पर्धेच्या वातावरण निर्मितीसाठी झालेल्या या प्रोमो रनच्या उत्साहाने संपूर्ण गोल्फ क्लब मैदानाला चैतन्याचा बहर आला होता. सर्वच वयोगटातील स्पर्धकांनी दिलेला प्रतिसाद आणि नामवंत खेळाडू आणि मान्यवरांच्या सहभागाने रंगलेल्या या भव्य स्पर्धेने महामॅरेथॉन स्पर्धेचा बिगुल फुंकला गेला.

लोकमत वृत्तपत्र समूहाच्या वतीने रविवार, दि. ८ ऑक्टोबरला नाशिक महामॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने गोल्फ क्लब मैदान येथून प्रोमो रन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल, आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत, मोनिका आथरे, मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इ. वायुनंदन, संदीप विद्यापीठाचे कुलगुरु कॅप्टन प्रा. एस. रामचंद्रन, सपकाळ नॉलेज हबचे चेअरमन रवींद्र सपकाळ, एलआयसीचे वरिष्ठ क्षेत्रीय प्रबंधक प्रदीप शेनॉय, योगगुरू प्रज्ञा पाटील, फॉर्च्युन फुडचे संचालक नरेश गुप्ता आदि मान्यवरांच्या हस्ते झेंडा दाखवून प्रोमो रनचा शुभारंभ करण्यात आला.

या रनसाठी पहाटे पाच वाजेपासून नाशिककर गोल्फ क्लब मैदानावर जमले होते. यामध्ये ७५ वर्षांच्या आजी-आजोबांपासून ते १० ते १२ वर्षांच्या मुले-मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, महिलावर्गाचा सहभाग लक्षणीय होता. मान्यवरांनी हवेत फुगे सोडून तसेच फ्लॅग दाखवित स्पर्धेला प्रारंभ केला आणि उपस्थितांसह सहभागी स्पर्धकांनी एकच जल्लोष केला. नाशिकमधे होऊ घातलेल्या सर्वात मोठ्या हाफ मॅरेथॉनच्या प्रोमो रनमध्ये सहभागी होत स्पर्धकांनी उत्साह दर्शविला.

प्रथम १० किलोमीटर अंतरासाठी धावणाऱ्या खेळाडूंची स्पर्धा सुरु झाली. त्यानंतर दहा मिनिटांनी ५ किलोमीटर अंतरासाठी धावपटू धावले. धावपटूंच्या पुढे मार्शल्स आणि रन मार्गावर ठिकठिकाणी वॉटर पॉइंट आणि वाद्यांचे पथक धावपटूंचे मनोधैर्य वाढवित होते. नाशिककरांनीही रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून त्यांना चिअरअप केले. अनेक मार्गांवर धावपटूंवर फुलांच्या पाकळ्यांचा वर्षाव करण्यात आला.

यावेळी हॉटेल एक्सप्रेस इनचे संचालक विकास शेलार, उद्योजक ललित बूब, सेवा ऑटोमोटिव्हचे आदित्य बाफना, अपोलो हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनुज तिवारी, मुख्य जनसंपर्क अधिकारी मंगेश जाधव, प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. पाटील, डॉ. मिलिंद भरडिया, डॉ. विकास गोऱ्हे, महापालिका सभापती हेमलता पाटील, डॉ. निवेदिता पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. 'लोकमत'चे सहायक उपाध्यक्ष बी. बी. चांडक, निवासी संपादक किरण अग्रवाल यांनी उपस्थितांचे स्वागत केले. पोलीस विभाग, वाहतूक पोलीस, महापालिका आणि नाशिक जिल्हा अ‍ॅथलॅटिक्स संघटनेचे राजीव जोशी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन शिल्पा भेंडे यांनी केले.

नावनोंदणीला मुदतवाढ

◆ ८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या नाशिक महामॅरेथॉन स्पर्धेच्या नावनोंदणीला लाभलेला प्रतिसाद लक्षात घेता या स्पर्धेसाठी नावनोंदणीची मुदत २५ सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आलेली आहे. नाशिकची सर्वात मोठी हाफ मॅरेथॉन स्पर्धा येत्या ८ ऑक्टोबरमध्ये नाशिकमध्ये रंगणार असून, या महा स्पर्धेत नाशिककरांना सहभागाची संधी मिळावी यासाठी नोंदणीची मुदत वाढविण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी आत्तापर्यंत नाशिककरांनी नोंदणीला प्रचंड प्रतिसाद दिला आहे. खास लोकाग्रहास्तव नोंदणीची मुदत वाढविण्यात आलेली आहे.

स्पर्धात्मक स्पर्धेतून ऊर्जा मिळाली

अशाप्रकारची प्रोमो-रन होऊ शकते, तर नाशिक महामॅरेथॉन स्पर्धा कशी असेल याची आताच उत्सुकता लागली आहे. महामॅरेथॉनमध्ये पळण्याची आता ओढ असून, उत्कृष्ट स्पर्धा आयोजनामुळे सहभागाचा उत्साह वाढला आहे. योग्य स्पर्धेत योग्य सहभाग आणि स्पर्धेत धावण्याचा अनुभव अद्‌भुत होता.

-कैलास गायकवाड, विजेता

◆

आंतराष्ट्रीय स्पर्धेचा अनुभव आला

नाशिकमध्ये इतकी व्यावसायिक मॅरेथॉन होऊ शकत असेल तर या स्पर्धेत खेळण्याचा अनुभव नक्कीच आंतरराष्ट्रीय दर्जाचाच म्हणावा लागेल. अतिशय चांगले नियोजन आणि दर्जेदार स्पर्धेमुळे धावण्यातील आत्मविश्वास वाढला आहे. नाशिकमध्ये अशा स्पर्धा वारंवार होणार असतील तर लोकमतने यात पुढाकार घेतला पाहिजे.

- यशराज पांगरे, विजेता

◆

स्पर्धेचा उत्तम दर्जा उत्साह वाढविणारा

आत्तापर्यंत अनेक स्पर्धा खेळलो आहे. नाशिकची महामॅरेथॉन अतिउच्च दर्जाचीच असेल याची अनुभूती प्रोमो-रनमधून आली आहे. अतिशय सूक्ष्म नियोजन आणि काटेकोर आयोजनामुळे स्पर्धेचा दर्जा वाढला आहे. आंतराष्ट्रीय मानांकानुसार झालेल्या या स्पर्धेत खेळण्याचा आनंद आहेच, आता ८ ऑक्टोबर रोजी होणारी नाशिक महामॅरेथॉन जिंकायची आहे.

- संतोष वाघ, विजेता, औरंगाबाद

◆

महामॅरेथॉन स्पर्धेची प्रतीक्षा

नाशिकसारख्या शहरात अशाप्रकारची दर्जेदार मॅरेथॉन होणार असेल तर मग महामॅरेथॉन कशी असेल याची प्रचिती आज आली. नाशिकमध्ये मॅरेथॉनला प्रोत्साहन देण्यासाठी जी मेहनत घेण्यात आली आणि जे नियोजन करण्यात आले ते अतिशय स्पर्धात्मक होते. मोठ्या शहरातील स्पर्धेच्या तुलनेतील या स्पर्धेचे नियोजन होते. यामुळे आता ८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या मुख्य स्पर्धेकडे लक्ष लागले आहे.

- नीलेश पाटोळ, विजेता, वरवंडी

◆

नाशिककरांसाठी नवी ओळख

गुडघ्यावर शस्त्रक्रिया झालेली असताना मी १० किलोमीटरमध्ये सहभाग घेतला. माझ्या मुलाबरोबर मी या स्पर्धेत उतरले याचा मला अधिक आनंद आहे. नाशिककरांसाठी ही स्पर्धा असल्याने नाशिककरांचा सहभाग महत्त्वाचा आहे. मॅरेथॉन स्पर्धेचे शहर निर्माण करण्यासाठी नाशिककरांचा प्रतिसाद महत्त्वाचा ठरणार आहे. उत्तम व्यवस्था, सर्व ठिकाणी योग्य नियोजन होते. त्यामुळे स्पर्धकांना अडचणी आल्या नाहीत. नाशिककरांसाठी ही स्पर्धा असल्याने नाशिककरांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदविणे अपेक्षित आहे. स्पर्धा आयोजनाचे कौतुक करायलाच पाहिजे. पोलीस आणि क्रु मेंबर्सचे सहकार्य लाभले.

- सरिता दास, शिक्षिका, केंब्रीज स्कूल

◆

आत्मविश्वास मिळाला

यापूर्वी आम्ही फक्त धावायचो. लोकमतने नाशिक मध्ये 'प्रोमो-रन'आयोजित करून आम्हाला पाच किलोमीटर धावू शकतो, असा आत्मविश्वास दिला. प्रोफेशनल टिचर्स असोसिएशनतर्फे यांत भाग घेतला. आता आम्ही दहा किलोमीटर धाऊ शकतो.

- पवन जोशी,
सदस्य, प्रोफेशनल टिचर्स असोसिएशन,

◆

उत्तम आयोजन

यापूर्वी आम्ही अनेक धावण्याच्या स्पर्धेत भाग घेतला. परंतू लोकमतने 'प्रोमो-रन'चे उत्तम आयोजन केले. धावण्याच्या शर्यतीबरोबर संगीताची मेजवानी दिली. मल्लखांबाच्या कसरती दाखविल्या. आम्ही सर्वच आनंदाने धावलो. बक्षिस मिळो वा ना मिळो, आनंद मिळाला.

- ललित बुब, उद्योजक

झुंबा, नृत्याने केले वॉर्मअप

गोल्फ क्लब मैदानावर उभारण्यात आलेल्या मंचावरुन पूनम आचार्य यांनी आपल्या चमूसह सादर केलेल्या झुंबा नृत्याने खेळाडूंमध्ये ऊर्जा निर्माण केली. अगदी चिमुकल्यांपासून ते आजोबांपर्यंत नाशिककर झुंबा नृत्यावर थिरकले. त्यानंतर नवीन डान्स अकॅडमीच्या कलावंतांनी कार्यक्रमात आणखी रंग भरला.

करण दर्डा, रुचिरा दर्डा यांची विशेष उपस्थिती

◆ 'लोकमत'चे कार्यकारी संचालक करण दर्डा आणि लोकमत महामॅरेथॉनच्या संयोजिका रुचिरा दर्डा यांची प्रोमो रनला विशेष उपस्थिती लाभली. प्रोमो रनमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांना उभयतांनी रॅली मार्गावर जाऊन प्रोत्साहनही दिले. खुल्या जीपमधून त्यांनी स्पर्धेची पाहणी केली. रुचिरा दर्डा यांनी फ्लॅग ऑन आणि पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी स्पेशल प्रोजेक्ट इंचार्ज आशिष जैन हेही उपस्थित होते.

सेल्फीची क्रेझ

◆ प्रोमो रनच्या निमित्ताने अनेक धावपटूंसह नाशिककरांनी ठिकठिकाणी सेल्फी घेऊन सोशल मीडियावर पोस्ट केली. त्यामुळे रविवारी सोशल मीडियावर नाशिक महामॅरेथॉन प्रोमो रनच्या सेल्फीची क्रेझ दिसून आली.

पी. व्यंकटरामन यांचे सहकार्य

◆ 'महामॅरेथॉन'च्या प्रोमोसाठी मुंबई येथील क्रीडा प्रशिक्षक पी. व्यंकटरामन यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांनी मुंबई येथील अनेक मॅरेथॉन स्पर्धांमध्ये क्रिडा प्रशिक्षक म्हणून काम पाहिले आहे. तसेच तांत्रिकदृष्ट्याही त्यांची या स्पर्धांना मदत लाभली.

'नाशिक महामॅरेथॉन'च्या प्रोमो रनमध्येही त्यांनी याच पद्धतीने स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता मोलाचे सहकार्य केले. स्पर्धेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बारीकसारीक तांत्रिक बाबींचे त्यांनी नियोजन केले. मॅरेथॉनच्या वेळेपासून ते नियमांपर्यंतची सर्व अंमलबजावणी करीत, त्यांनी धावपटूंचे मनोबल वाढविले. पी. व्यंकटरामन हे 'सोफा टू फाइव्ह के' या पुस्तकाचे लेखक आहेत. प्रोमो रनमधील विजेत्या धावपटूंचा सन्मान करताना त्यांना सदर पुस्तक भेट म्हणून दिले. धावपटूंना या पुस्तकाचा लाभ होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

Nashik's Biggest Half Marathon
PROMO-RUN
Nashik Maha Marathon
Lokmat Times
लोकमत

नाशिक महामॅरेथॉन पूर्व तयारीच्या प्रोमो रनला झेंडा दाखवून शुभारंभ करताना पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल. समवेत योगगुरु प्रज्ञा पाटील, सपकाळ नॉलेज हबचे चेअरमन रवींद्र सपकाळ, डॉ. विकास गोऱ्हे, संदीप विद्यापीठाचे कुलगुरु कर्नल एस. रामचंद्रन, मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु ई. वायुनंदन, एलआयसीचे वरिष्ठ क्षेत्रिय प्रबंधक प्रदीप शेनॉय, आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत, मोनिका आथरे व 'लोकमत' महामॅरेथॉनच्या संयोजिका रुचिरा दर्डा.

लहानग्यांचा विशेष उत्साह

शहरात क्रीडा क्षेत्रासाठी पोषक वातावरण निर्माण झालेले असताना 'नाशिक महामॅरेथॉन' स्पर्धेनिमित्त नाशिककरांमध्ये विशेष उत्साह बघायला मिळत आहे. ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या मॅरेथॉन स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या प्रोमो-रनमध्ये लहान मुलांचा तसेच कुटुंबातील प्रत्येक सदस्यांसह धावणाऱ्या धावपटूंचादेखील महत्त्वपूर्ण सहभाग यावेळी बघायला मिळाला. रविवारची सुटी आणि लोकमतवरील प्रेम असा मेळ साधत नाशिककरांनी या रनला भरघोस प्रतिसाद दिला.

चाटे कोचिंग क्लासच्या विद्यार्थ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका

चाटे कोचिंग क्लासेसच्या ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी प्रोमो-रन मध्ये स्वयंसेवकाची भूमिका अत्यंत चोखपणे निभावली. रनमध्ये धावणाऱ्या धावपटूंना मार्ग दाखविण्याच्या सूचना करण्यासह या धावकांना पाणी तसेच एनर्जी ड्रिंक पुरविले. ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या वॉटरस्टेशनवरदेखील वाहतूक कोंडी सोडविण्यात या विद्यार्थ्यांनी सहाय्य केले. रन मार्गावर धावणाऱ्या धावपटूंवर फुलांच्या पाकळ्या उधळून धावपटूंचे स्वागत करण्याबरोबरच स्पर्धेदरम्यान त्यांचा उत्साह वाढविण्याच्या प्रयत्नदेखील या विद्यार्थ्यांनी केला.

मायको सर्कलवर रॉक बॅण्ड : रन बघण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा तसेच चौकाचौकात नाशिककरांची मोठ्या प्रमाणात गर्दी बघायला मिळाली. रॅली मार्गात मायको सर्कल येथे रॉक बॅण्ड पथकांने आपल्या कलाविष्काराने स्पर्धकांचा उत्साह वाढविला.

एबीबी सर्कलवर ढोल-ताशा : रनमधील सहभागी स्पर्धकांचा उत्साह वाढविण्यासाठी नागरिकांनी 'भागो रे', 'बहुत अच्छे', 'किप इट अप', 'वेल डन' अशा घोषणा देत टाळ्या वाजवत प्रतिसाद दिला. कान्हेरे मैदान, एबीबी सर्कल, महिंद्रा सर्कल याठिकाणी ढोलपथकांनी स्पर्धकांचा उत्साह वाढविला.